# तोरण

अंक ८२-८३ ऑक्टोबर २००९ – मार्च २०१०

संपादकीय
पशुवैद्यकीय डॉक्टर कुणाला म्हणावे?
गोमुत्राची उपयुक्तता
कोंबडीच्या अंड्यांपासून पावडर
तुम्हाला हे माहित आहे का?
ससेपालन व इमु पालन
पाककला स्पर्धा –
नरबे, रत्नागिरी व कोथळे, सोलापूर
वाचकांना आवाहन
अंतरातील घडामोडी

देणगी मूल्य : रु. ५/-

## संपादकीय

### पशुकल्याण

पारंपरिक पशुकल्याणामध्ये मानव पालन करत असलेल्या जनावरांची सर्व त-हेने काळजी घेणे याचा मुख्यत्वेकरुन समावेश होतो. पूर्वी, जनावरांना खाद्य, पाणी व निवारा पुरवणे आणि जनावरांना काही वेदना होत नाहीत ना ह्याची खात्री करुन घेणे हा जनावरांची काळजी घेण्यातला मुख्य भाग होता. त्याबरोबरच जनावरांना क्रूरपणे हाताळले जात नाही ह्याचीही खात्री करुन घेतली जायची. पण आज, पशुपालनाच्या आधुनिक पध्दती अस्तित्वात आल्यामुळे पशुकल्याणात अजून ब-याच काही गोष्टींचा समावेश होतो.

आजकाल पाश्चिमात्य देशातून जनावरे कारखाना किंवा औद्योगिक पध्दतीने पाळली जातात. विशेषकरुन, पोल्ट्री उद्योगाला ही पध्दत जास्त प्रमाणात लागू आहे व ही औद्योगिक पध्दत आज भारतातल्या पोल्ट्री व्यवसायामध्येही सर्वत्र दिसून येते. लाखापेक्षा जास्त कोंबड्या असलेली पोल्ट्री फार्मस् देशात सगळ्या ठिकाणी आहेत. ह्या कोंबड्या त्यांचे सबंध आयुष्य पिंज-यामध्येच घालवतात. त्यांना पिंज-यात बंदिस्त व जवळ जवळ ठेवले गेले असल्यामुळे, त्या बरेच वेळा एकमेकांना टोचे मारतात. एकमेकांना टोचे मारुन इजा होऊ नये म्हणून त्यांच्या चोचा कातरल्या जातात. त्यांचे अन्न शोधण्याकरता त्या बाहेर फिरू शकत नसल्यामुळे त्यांना मालकाकडून जागेवरच खाद्य व पाणी पुरवले जाते. ह्या अन्नामध्ये काही वेळेला काही आवयक पोषक घटकांची कमतरता असते व त्याचाच परिणाम म्हणून कोंबड्या रोगट दिसायला लागतात. कोंबड्या आजारी पडू नयेत याकरता प्रतिबंधक उपाय म्हणून सतत खाद्यातून व पाण्यातून औषधे दिली जातात.

याशिवाय, ह्या कोंबड्यांना व्हॅनमधून लहान लहान पिंज-यातून बाजारपेठेत पोहोचण्याकरता लांबचा प्रवासही करावा लागतो. वारा, उन, पाऊस अशा सर्व त-हेच्या हवामानातून ही वाहने रस्त्यावरुन दीर्घ काळ प्रवास करत असतात. याचाही कोंबड्यांवर ताण पडत असणारच.

जसजशी लोकांना मोठा प्रमाणावरच्या पशुपालनातल्या ह्या परिस्थितीची जाणीव व्हायला लागली आहे, तशी अशा त-हेच्या कोंबडीपालनाला किंवा इतर जनावरांचेही अशा त-हेने पालन करण्याला विरोध करायला लोकांनी सुरूवात केली आहे. पशुपालन करणा-या शेतक-यांना पशुकल्याण्याच्या दृष्टीने खालील पाच सूत्रे पाळण्याचे आवाहन करण्यास पशुकल्याण गटांनी सुरूवात केली आहे. केवळ जनावरांना व्यवस्थित ठेवणे एवढेच पुरेसे नाही तर त्यांच्या मूलभूत गरजांकडे लक्ष दिले जाते आहे ह्याची खात्री करून घेणेही तेवढेच गरजेचे आहे.

**पशुकल्याणाची पाच सूत्रे**

- **तहानभूकेपासून मुक्ति** - स्वच्छ पाणी व निरोगी राहण्याकरता व ताकद टिकवण्याकरता चांगला आहार यांच्या सहज उपलब्धतेतून
- **अस्वस्थतेपासून मुक्ति** - निवारा व आरामशीर विश्रांतीची जागा यासह आसपास योग्य वातावरण असेल ह्याची तरतूद करून
- **वेदना, इजा व आजारापासून मुक्ति** - प्रतिबंधक उपाय किंवा त्वरित निदान व उपचार करून
- **नेहमीच्या नैसर्गिक प्रवृत्तीप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य** - पुरेशी जागा, योग्य सुविधा पुरवून
- **भिती व क्लेशापासून मुक्ति** - मानसिक यातना होऊ नयेत याकरता योग्य वातावरण व वागणूक राहिल याची खात्री करून घेऊन

**डॉ. नित्या घोटगे**
**संचालिका, अतरा, पुणे**

## पशुवैद्यकीय डॉक्टर कुणाला म्हणावे?

नोंदणीकृत पशुवैद्यकीय डॉक्टर म्हणजे भारतीय पशुवैद्यकीय परिषदेंतर्गत नोंदणी झालेला पदवीधर पशुवैद्यक होय. पशुवैद्यकीय शास्त्रात पदवी मिळवण्याकरता बारावीनंतर पाच वर्षाचा शिक्षणक्रम पुरा करावा लागतो. पशुवैद्यकीय अभ्यासक्रमाकरता स्वतंत्र महाविद्यालये असतात. महाराष्ट्रात परळ, मुंबई, उदगीर, परभणी, शिरवळ, नागपूर ह्या ठिकाणी पाच पशुवैद्यकीय महाविद्यालये आहेत. ही महाविद्यालये महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ (MAFSU) च्या अंतर्गत येतात.

भारतीय पशुवैद्यकीय परिषद अधिनियम १९८४ साली अस्तित्वात आला. भारत भरातील उपचारपध्दती नियंत्रित करणे, भारतीय पशुवैद्यकीय परिषद स्थापन करणे, राज्य पशुवैद्यकीय परिषद स्थापन करणे, पशुवैद्यकीय प्रॅक्टिशनरच्या रजिस्ट्रेशनची व्यवस्थित नोंद ठेवणे व त्याच्याशी निगडित इतर बाबी सांभाळणे ही ह्या कायद्याची मुख्य उद्दिष्टे आहेत.

ह्या कायद्यानुसार फक्त नोंदणीकृत पशुवैद्यक प्रॅक्टिशनरच सरकारी किंवा खाजगी क्षेत्रात प्रॅक्टिस करु शकतात. पशुवैद्यक प्रॅक्टिानरलाच रोगनिदान करणे, इंजेक्शन देणे, प्रतिजैविक औषधे (antibi-otics) विहित करणे, शस्त्रक्रिया करणे, इत्यादीसारखे विशेष उपचार करण्याचा अधिकार असतो. डिप्लोमा किंवा सर्टिपिकेट घेतलेले व्हेटेरीनरी परीवेक्षक, एल.एस.एस. इ. नोंदणीकृत पशुवैद्यक प्रॅक्टिशनरच्या मार्गदर्शनाखाली व देखरेखी-खाली किरकोळ सेवा देऊ शकतात.

जेव्हा गरज असेल तेव्हा नोंदणीकृत पशुवैद्यक प्रॅक्टिशनरचे पशुसंदर्भात दिलेले इनुअरन्स/पोस्टमॉर्टेम सर्टिफिकेटच कायद्याच्या दृष्टीने गृहीत धरले जाते. तसेच पशुंच्या औषधोपचाराच्या संदर्भात जर कोर्टात साक्ष द्यायची वेळ आली तर नोंदणीकृत पशुवैद्यक प्रॅक्टिशनरची साक्षच ग्राह्य धरली जाते.

ज्या व्यक्तिंचे योग्य िक्षिण झाले नसेल किंवा ज्यांना रीतसर लायसेन्स नसेल असा व्यक्ति जर पशुवैद्यक डॉक्टर म्हणून प्रॅक्टिस करत असतील तर तो कायद्याने गुन्हा ठरु शकतो.

सुप्रिम कोर्टाने नुकत्याच दिलेल्या अधिनियमानुसार एल.एस.एस.ना त्यांच्या नावाआधी 'डॉक्टर' लिहिण्याची परवानगी दिली आहे. त्यांना पुरेसा अनुभव नक्कीच आहे परंतु नवीन औषधे वापरण्याच्या दृष्टीने पुरेसे सैध्दांतिक ज्ञान असेलच असे नाही.

# गोमुत्राची उपयुक्तता

हिंदू धर्मामध्ये गोमूत्राला फार पवित्र मानले गेले आहे व म्हणून त्याला अनन्यसाधारण महत्व प्राप्त आहे. गायीपासून मिळणारे दूध, दही, तूप, गोमूत्र आणि शेण या धार्मिक विधींमध्ये विविध शुध्दीकरण उपचाराकरता वापरल्या जातात. गायीपासून मिळणारे पिवळे रंगद्रव्य म्हणजेच शेण याचा उपयोग विष्णूच्या सुदर्शन चक्राची पुजा करण्याकरता वापरले जाई अशी त्याची ख्याती आहे (मनु-स्मृती - ३९). तसेच गोमूत्रातल्या औषधी गुणधर्मामुळे ते इतर विविध कारणाकरता उपयोगात आणले जाते. आज गोमूत्राच्या एका बाटलीला ३० पैसे अशी किंमत आहे. त्याचा उपयोग यकृताच्या आजारापासून ते लठ्ठपणा व कॅन्सर या व्याधींकरताही केला जातो.

सेंद्रिय शेतीमध्ये जे पंचगव्य व अमृतपाणी वापरतात त्यातला गोमूत्र हा महत्वाचा घटक आहे. याशिवाय कीटकनाशक म्हणूनही वनस्पतींवर गोमूत्राची फवारणी करतात.

**गोमुत्रातील प्रमुख व उपयोगी घटक आणि त्यांची विविध कार्ये -**

१. **युरिया** - गोमूत्रात आढळून येणा-या घटकांपैकी युरिया हा मुख्य घटक आहे. हा प्रथिनांच्या घटकांच्या चयापचय क्रियेमध्ये तयार होणारा अंतिम पदार्थ आहे. हा अतिशय प्रभावी जीवाणूनाशक घटक आहे.

२. **युरिक आम्ल** - युरिया घटकाप्रमाणे अतिाय प्रभावी आहे. ह्यातही जीवीणू-नाशक गुणधर्म आहेत. याव्यतिरिक्त हे आम्ल कर्करोगास कारणीभूत काही घटकांचे नियंत्रण करण्यास मदत करते असे म्हटले जाते.

३. **खनिजे** - अन्नापासून मिळणा-या खनिजांच्या तुलनेत गोमूत्रातील खनिजांचे पुर्नशोषण सहज होते. गोमूत्रातून मिळणारी खनिजे विविध प्रकारची असतात. काही काळ गोमूत्र स्थिर राहिल्यास ते गढुळ होते. गोमूत्रातील एंझाईम्स युरिया घटकाचे अमोनियात रुपांतर करतात. त्यामुळे गोमूत्र अतिाय अल्कलीसारखे बनते. त्याचा परिणाम म्हणून मूलभूत खनिजे विरघळण्यास अडथळा येतो. शिळे गोमूत्र गढूळ दिसते पण ते खराब झाले आहे असे नाही. त्यात अमोनियाचे प्रमाण वाढल्यामुळे त्वचेवर लावल्यास त्वचेचे सौंदर्य वाढवण्यास मदत करते.

**डॉ. सचिन हगवणे**

# कोंबडीच्या अंड्यापासून पावडर

कोंबड्यांची अंडी वापरुन विविध पाककृती करता येतात हे सर्वांनाच माहित आहे. ह्याच अंडांपासून पावडर तयार केली तर तिचाही वेगवेगळ्या पदार्थात वापर करता येतो. विशेषतः प्रगत देशामध्ये अंड्यांपासून बनवलेल्या पावडरचा जास्त उपयोग केला जातो.

भारतात मोठा प्रमाणावर अंड्यांचे उत्पादन होते. अंड्यांपासून पावडर बनवण्याच्या उद्योगाला भारतात सर्वप्रथम १९९०च्या आसपास सुरुवात झाली. व्यावसायिक कोंबडीपालनात भारतात अग्रेसर असलेल्या व्यंकटेश्वर हॅचरीज या कंपनीने हैद्राबादजवळ अंड्यापासून पावडर बनवण्याची फॅक्टरी सुरू केली. सध्या देशात तामिळनाडूमध्ये एरोड येथे एस.के.एम. व कर्नाटकात बंगलोर येथे ओव्होबेल फुड इंडस्ट्रीज अशा अंडांची पावडर बनवणा-या आणखी दोन कंपन्या आहेत.

अंडी नाशवंत असल्यामुळे ती जास्त काळ टिकावीत हाच अंड्यांची पावडर बनवण्यामागचा प्रमुख उद्देश असतो. अंडी उत्पादन मोठा प्रमाणावर असले की वापरून शिल्लक राहिलेल्या अंड्यांची पावडर बनवली जाते. ही पावडर नुडलस्, पास्ता तसेच ब्रेड व इतर बेकरी पदार्थ, मेयोनेज किंवा काही मांसाहारी पदार्थातही वापरली जाते. औषधे व सौंदर्य प्रसाधने यातही तिचा वापर होतो. अंड्यांच्या वेगवेगळ्या घटकांची, म्हणजे पिवळा बलक, पांढरा भाग किंवा संपूर्ण अंड्यांची पावडर अशी वेगवेगळी उत्पादने तयार करता येतात.

भारतातील बेकरी उत्पादक अंड्यांची पावडर वापरण्यापेक्षा अंडीच वापरतात. अंडी स्वस्त व मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे भारतात अंड्यांपासून बनवलेल्या पावडरला मागणी नाही. सध्या इथे तयार झालेली पावडर पूर्णपणे निर्यात केली जाते.

अंड्यांची पावडर निर्यातक्षम बनवण्यासाठी, कंपन्यांना कोंबड्यांच्या फार्मपासून ते फॅक्टरीतून बाहेर पडेपर्यंतच्या अंतिम टप्प्यापर्यंत काटेकोरपणे जैव-सुरक्षा उपाय (bio-safety measures) व खाद्य-सुरक्षा उपाय (food-safety measures) अवलंबावे लागतात. अंडी पावडर उत्पादन कोणत्या देशात निर्यात करायचे आहे त्यानुसार त्या त्या देशाचे जैव-सुरक्षा नियम व खाद्य-सुरक्षा नियम पाळावे लागतात. काही प्रमुख नियमांचा खाली उल्लेख केला आहे -

१. कोंबड्यांचा फार्मची बांधणी प्रमाणित नमुन्याप्रमाणे असावी. फार्मची स्वच्छता सांभाळायला हवी. जैव-सुरक्षेची पूर्ण खात्री करुन घेतलेली असावी.
२. कोंबड्यांना कोणत्याही प्रकारची प्रति-जैविके व वाढीला चालना देणा-या गोष्टी

देऊ नयेत. जर कोंबड्यांना आजारपणात काही औषधे द्यावी लागली तर शरीरातला औषधाचा अवशेष पूर्ण नाहीसा होईपर्यंत अशा फार्ममधून मिळणा-या अंड्यांची पावडर करता येत नाही.

३. कोंबड्यांना देण्यात येणा-या खाद्यामध्ये रासायनिक कीटकनाशकांचा अंश असता कामा नये.

४. कोंबड्यांचे खाद्य व पाणी, वेळेवर लसीकरण या गोष्टी प्रमाणित केलेल्या माहितीनुसार आहेत याबद्दलची दक्षता सांभाळावी.

५. कोंबड्यांकरता नियोजित केलेल्या जागेचा आकार, त्यांची चोच छाटणीची वेळ याविषयी जागरुकता असावी व ते मान्यताप्राप्त प्रमाणानुसार असावे.

भारतातून निर्यात होणा-या अंडी पावडरमध्ये रासायनिक कीटकनाशकांचा व प्रति-जैविकांचा अंश असण्याची जास्त शक्यता असल्यामुळे, अंडी पावडर तयार करणा-या कंपन्या ठराविक कोंबडीपालकांशी करार करुन त्यांच्या प्रमाणानुसार अंडी उत्पादन करुन घेतात.

अंडी पावडर तयार करण्यासाठी लागणारी अतिशय महाग यंत्रसामग्री, तपासणीसाठी लागणारी प्रयोगाशाळा व रासायनिक कीटकनाशकांचा व प्रति-जैविकांचा अंश अंड्यांमध्ये असण्याची शक्यता जास्त असल्यामुळे, अंडी पावडर उद्योग जोखमीचा आहे. अगोदर भारतात सहा ते सात उत्पादन प्रकल्प होते ते आज तीनवर आले आहेत.

या उद्योगातील अडचणी, आव्हाने व भारतातल्या सद्यस्थितीवर अभ्यास करण्या-साठी वॅगेनिंगेन विद्यापीठ, नेदरलँडस्, वृत्ती संस्था, बंगलोर यांच्याबरोबर अंतरामध्ये नुकताच एक अभ्यास प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाद्वारे भारतातील निर्यातक्षम अंडी पावडर बनवणा-या कंपन्यांच्या कार्यप्रणालीचा आणि जैव व खाद्य सुरक्षा नियमांचा आढावा घेण्यात येणार आहे. तसेच या कंपन्यांशी कराराद्वारे जोडल्या गेलेल्या कोंबडीपालकांशी त्यांच्या उद्योगातील अडचणी व आव्हाने, इत्यादीविषयी चर्चा करण्यात येणार आहे.

**डॉ. गायत्री राजूरकर**

## तुम्हाला हे माहित आहे का?

सबंध जगात अंडी उत्पादनात आज चीनचा पहिला, अमेरिकेचा दुसरा व भारताचा तिसरा नंबर आहे.

भारतात अगदी नियमितपणे अंडी खाल्ली जात नाहीत त्यामुळे त्यांना नियमित ग्राहक नाहीत. श्रावण महिना, चातुर्मास किंवा घरात पुजा वगैरेसारखा धार्मिक विधी असेल तर अंडी बहुतेक घरातून वर्ज्य असतात.

शिल्लक राहिलेली अंडी फुकट न घालवता त्यांचे पावडरमध्ये रुपांतर करता येते. अंड्यांच्या पावडरला जपान व युरोपमधल्या अन्न प्रक्रिया उद्योगामध्ये भरपूर मागणी आहे.

# पशुपालनातील नवीन वाटांविषयी....

सध्या पशुपालनात काही नवीन जोडधंद्यांचा उल्लेख येत असतो. त्यापैकी दोन म्हणजे ससेपालन व इमुपालन. ह्या दोन्हीची महिती थोडक्यात खाली देत आहोत.

## ससेपालन

ससेपालन ह्या व्यवसायाकडे आजकाल बरीच शेतकरी मंडळी उत्पन्नाची 'हमखास बाब' ह्या जाहिरातीमुळे आकर्षित होताना दिसत आहेत. ससेपालन हा एक जोडधंदा होऊ शकतो. फायदेशीर ससेपालन करायचे असले तर खालील तांत्रिक बाजू नीट समजून घेणे आवयक आहे.

१. ससेपालनातील प्रशिक्षण
२. जागा, पाणी व चा-याची व्यवस्था
३. सशांच्या आजाराविषयी माहिती
४. सशांच्या बाजारपेठेची पूर्ण माहिती

अनेक संस्था ससेपालनाचे प्रशिक्षण देतात. त्यांच्या मते ससेपालनात काही फायदे आहेत. ससेपालनाला महत्व आले आहे कारण असा समज आहे की -

१. व्यावसायिक कोंबडीपालनाच्या तुलनेत ससेपालनात भांडवल व व्यवस्थापन यावरील खर्च बराच कमी आहे. कमीत कमी १५-२० जोडा (३०-४० नग) वापरुन हा धंदा सुरू करता येतो. व्यावसायिक कोंबडीपालनात किमान ५०० कोंबड्यां-द्वारे धंदा सुरू करावा लागतो.
२. सशांच्या वजनात कमी वेळेत अधिकाधिक वाढ होते (आठ आठवड्यात २-२५ किलो.)
३. व्यावसायिक कोंबडीपालनाप्रमाणे ससेपालनात विशेष गोळीखाद्य द्यावे लागत नाही. शेतात असलेला हिरवा चारा व झाडपाला चालतो. त्यामुळे मूळ खाद्यावर खर्च कमी होतो.
४. फर असणा-या सशाचे पालन केल्यास फर विक्रीतून नफा मिळवता येतो.

### ससेपालनातल्या अडचणी

१. अगदी लहान प्रमाणावर जरी हा धंदा सुरू करायचा असेल तरी तो सुरू करायला घरगुती कोंबडीपालनाकरता लागणा-या भांडवलापेक्षा ब-याच जास्त प्रमाणात भांडवली गुंतवणूक लागते.
२. भारतात मांसाहारासाठी मोठा प्रमाणात किंवा नियमित स्वरूपात साचे मांस खाण्यासाठी अजूनही पूर्णपणे वापरले जात नाही.
३. आपल्या देशात अजून सशाचे मांस व फर यांच्या विक्रीसाठी खास व्यवस्था नाही.
४. ससेपालनासाठी किमान मूलभूत व्यवस्थापनाची माहिती असावी लागते.
५. आजारपणामुळे सशांच्या मृत्युचे प्रमाण खूप जास्त असते. त्याविषयीची संपूर्ण शास्त्रोक्त माहिती असणे आवयक आहे.

ससेपालनात तांत्रिक सहाय्य व प्रशिक्षण देणा-या संस्था सशाचे मांस ससेपालकाकडून परत विकत घेण्याचा करार करतात. परंतु सशाच्या मांसाला अधिक मागणी नसल्यामुळे असे करार पूर्ण होऊ शकत नाहीत. ह्यामुळे ससेपालन करणारे शेतकरी अडचणीत येऊ शकतात. ससेपालन हा जोडधंदा सोपा वाटत असला तरी आजारामुळे होणारे सशांच्या मृत्युचे प्रमाण, कमी मागणी, मांस विक्रीत येणारा अडथळा व अपुरी माहिती यामुळे होणारे नुकसान ह्यामुळे हा व्यवसाय तोटात जाऊ शकतो.

हा व्यवसाय निवडताना ससेपालना-विषयीची स्वतःची माहिती, मांसासाठी बाजारपेठ व त्याला मिळणारा भाव, अनुभवी व्यक्तीचा सल्ला या गोष्टींचा आधी विचार करुन मगच हा व्यवसाय निवडावा.

## इमु पालन

इमु हा शहामृगासारखा दिसणारा पक्षी मुळचा ऑस्ट्रेलिया या देशातला आहे. कोंबडीपालन, वराहपालन, ससेपालन ह्या जोडधंद्यांच्या तुलनेत इमु पालनाला कमी भांडवल, कमी मजूर, चांगली मागणी व जास्त परतावा अशी जाहिरात येत असल्यामुळे सध्या इमु पालन खूप चर्चेत आहे.



इमु पालनाला भारतात अंदाजे १९९५ मध्ये सुरूवात झाली. अगदी सुरूवातीला, भारतात इमु बाहेरील देशातून आधी अंड्याच्या किंवा पिल्लांच्या रुपात आणले व नंतर आपल्या इथे ह्या पक्षांचे ब्रीडर फार्म सुरू झाले.

इमु पालनातील प्रशिक्षण व तांत्रिक सहाय्य देणा-या संस्था इमु उत्पादनाचे खालीलप्रमाणे उपयोग सांगतात.

**इमु पिल्ले** - इमु पालनाला असणारी वाढती मागणी बघता इमु पिल्लांच्या विक्रीतून नफा होऊ शकतो.

**इमु तेल** - इमुच्या चरबीपासून बनविण्यात येणारे तेल औषधी आहे असे मानतात व त्वचा विकाराकरता आणि संधिवाताकरता ते वापरले जाते..

**इमु अंडी** - एका इमु जोडीपासून वर्षाकाठी २०-३० अंडी मिळतात. ही अंडी पिल्ले मिळवण्याकरता किंवा औषधात वापरली जातात. अंडांची टरफले विविध शोभेच्या वस्तू तयार करण्याकरता वापरली जातात.

**इमु मांस** - इमु मांस हे ९८% चरबीमुक्त (fat free) असते. एका इमुपासून २५ किलो मांस मिळू शकते.

**इमुची कातडी** - इमुची कातडी मऊ असते. कातडी (लेदर) उद्योगात इमुच्या कातडीला मागणी आहे. एका पूर्ण वयाच्या (३० वर्षे) इमुपासून ६-८ चौरस फूट कातडी मिळते.

**इमु पिसे व नखे** - शोभेच्या वस्तू तसेच (दागिने, हस्तकला), दैनंदिन वापरायच्या वस्तू (डस्टर, उशी, ब्लेझर) बनवण्याकरता इमुच्या पिसांचा व नखांचा वापर होतो.

**इमु पालनातील अडचणी**

१. इमु पालनासाठी मोकळी जागा असावी लागते.
२. इमु पालन करण्यासाठी किमान १०-२० पक्षी (५ जोडा) असाव्या लागतात. एवढे पक्षी विकत घ्यायला साधारण दीड लाखाच्यावर खर्च येतो.
३. इमुसाठी खाद्याची विशेष व्यवस्था करावी लागते. काही कंपन्या 'इमु फीड' तयार करतात.
४. इमु पालन व्यवसाय जेव्हा सुचवला जातो तेव्हा इमु पक्षाला फार आजार होत नाहीत असे सांगितले जाते. परंतु कोंबड्यांना होणा-या राणीखेत ह्या आजाराची बाधा इमु पक्षालाही होते.
५. इमुच्या मांसाची विक्री करण्याकरता बाजारपेठ सहज उपलब्ध नाही. इमुच्या सर्व उत्पादनांसाठी बाजारपेठेची माहिती व विक्रीची खात्री असणे आवयक आहे.

इमु पालनाचे वाढते आकर्षण लक्षात घेता, केवळ जाहिरातींना न भुलता, आधी तांत्रिक माहिती घेऊन, उत्पादनांच्या विक्रीची खात्री असेल तरच या जोडधंद्याचा गंभीरपणे विचार करावा.

महाराष्ट्रात नाबार्डतर्फे व काही राष्ट्रीयकृत बँकांतर्फे इमु पालनासाठी आर्थिक सहाय्य पुरवले जाते.

**डॉ. गायत्री राजूरकर**

## पाककला स्पर्धा - नरबे, रत्नागिरी व कोथळे, सोलापूर

दि. ८ मार्च २०१० रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिलांना सेंद्रिय पदार्थांपासून पारंपरिक पाककृती करायला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने नरबे, रत्नागिरी व कोथळे, सोलापूर इथे अंतराच्या कार्यक्षेत्रात पाककला स्पर्धा आयोजित केल्या होत्या. सर्व स्पर्धकांना अंतरातर्फे प्रमाणपत्रे देण्यात आली व पहिल्या तीन विजेत्यांना ट्रॉफी देण्यात आली. दोन्ही ठिकाणी परिक्षकांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला.

**नरबे**

नरबेच्या कार्यक्रमाला अंतराच्या संचालिका डॉ. नित्या घोटगे व परिक्षक म्हणून सौ. सुरेखा पात्रे-जोशी उपस्थित होत्या. अंतराच्या जुन्या कार्यकर्त्या सौ. देवश्री वीर व सौ. सविता कुलये याही कार्यक्रमाला हजर होत्या. या निमित्ताने शेतीतील सर्व कामे महिला करतात ह्याचे डॉ. घोटगेंनी आपल्या भाषणात कौतुक करुन, त्यांना शेतीत पारंपरिक बियाणांचा जास्तीत जास्त वापर झाला पाहिजे व त्याचबरोबर भाताच्या लागवडीकरता एस.आर.आय. पध्दतीची चारसुत्री लागवड कशी करावी ह्याची माहितीही करून घ्यावी असे सांगितले. जुने टिकवण्या बरोबरच नवीन चांगल्या गोष्टींची माहिती करून घ्यायला पाहिजे यावर त्यांनी भर दिला.

दि. ९ मार्च २०१० रोजी प्रत्यक्ष पाककला स्पर्धा घेण्यात आली. दिवसा राबच्या कामात महिला गुंतल्या असल्यामुळे स्पर्धा उशिरा सुरू झाली. सुमारे ३० महिला, २० पुरूष व २५ मुले कार्यक्रमाला उपस्थित होती. गावातील महिलांनी उत्स्फूर्तपणे कार्यक्रमात भाग घेतला होता. बाराजणींनी स्पर्धेत भाग घेतला होता. सौ. सुरेखा पात्रे-जोशी यांनी परिक्षकाचे काम केले. आवळा, नाचणी, नारळ यासारख्या पोषणमूल्य भरपूर असलेल्या पदार्थांनी स्पर्धेला लज्जत आणली. बनविलेले पदार्थ चविष्ट, रुचकर व आरोग्यास चांगले असे होते. नाचणीच्या सत्वापासून बनविलेल्या शेवयांची खीर या पदार्थास प्रथम पारितोषिक देण्यात आले.

**स्पर्धेत यशस्वी झालेल्यांची नावे व क्रमांक खालीलप्रमाणे आहेत.**

१. वृषाली घाणेकर - नाचणी शेवई खीर

२. गीता गणपत रामगडे - नाचणी लाडू
वैशाली दत्ताराम घाणेकर - तीळ लाडू (विभागून)

३. अनुराधा घाणेकर - नाचणीच्या करंज्या
इंदिरा गोपाळ घाणेकर - आवळा मुरंबा (विभागून)



या कार्यक्रमाच्या निमित्ताने इतर काही विषयांचीही चर्चा झाली. डॉ.घोटगे यांनी हवामान बदलासंदर्भात माहिती दिली. त्यावेळेस अवेळी पावसामुळे आंबा व काजू उत्पादनावर कसा परिणाम झाला आहे याबद्दलही सभेत चर्चा झाली. सौ. सुरेखा पात्रे-जोशी यांनीही महिलांना मोलाचे मार्गदर्न केले. रत्नागिरी भागात मुलांचे कुपोषण होऊ नये म्हणून स्पर्धेत असलेल्या सारख्या भरपूर प्रथिने असलेल्या पाककृती मुलांना बनवून द्याव्यात. त्याचप्रमाणे मुलांच्या खाऊसाठी एक कोपरा करून मुलांना येताजाता तो खाऊ खाता येईल अशी व्यवस्था करावी असे त्यांनी सुचवले. घरदार व नातेसंबंध सांभाळत असताना स्त्रियांनी आजूबाजूला काय घडामोडी घडत आहते ह्याचेही भान ठेवावे. मुलांच्या शिक्षणासाठी वेळप्रसंगी पोटाला चिमटा काढून त्यांना स्वतःच्या पायावर उभे करावे. त्याचबरोबर पुरुषांनीही घरातल्या कामात स्त्रियांना मदत करावी व बरोबरीच्या नात्याने त्यांच्या समस्या समजून घ्याव्यात. शिवाय शेतीतील बहुतांश कामांना स्त्रिया हातभार लावतात ह्याचीही पुरुषवर्गाने जाणीव ठेवावी असेही त्या म्हणाल्या.

**सौ. अपर्णा पाटील**

**कोथळे**

दि. ७-३-२०१० रोजी कोथळे (दडसवस्ती) येथे अंतरातर्फे प्रथमच पाककला स्पर्धा घेण्यात आली होती. कार्यक्रमाला १८ महिला उपस्थित होत्या त्यापैकी १२ महिलांनी स्पर्धेत भाग घेतला होता. त्यांनी वेगवेगळे पारंपरिक पदार्थ करुन आणले होते. असे पदार्थ करुन ते सर्वांसमोर ठेवण्याचा अनुभवही त्यांना नवीन

होता. अंतरा संस्थेचा हा आगळावेगळा कार्यक्रम महिलांना खूप आवडला. प्रत्येकींनी आंबट, गोड, तिखट, कुरकुरीत, दुधापासून बनवलेले असे चार किंवा पाच पदार्थ आणले होते. ज्या तीन महिलांची पारितोषिकाकरता निवड केली होती त्यांचे पदार्थ आजकाल कमी प्रमाणात केले जाणारे पदार्थ होते. विजेत्यांची नावे व क्रमांक खालीलप्रमाणे आहेत.

१. यशोदा ज्योती दडस - गवली (लहान लहान वडे. नेहमी गव्हाच्या पीठाचे करतात. त्याऐवजी ज्वारीच्या पीठाचे केले होते)

२. लाडुबाई नाथा दडस - हुलग्याचे माडग (धिरडे)

३. शेवंता जनार्दन दडस - गहू व ज्वारीच्या पीठाच्या चकुल्या (वरणफळं)

सौ. शोभा महांकाळ, माता बालक संस्था, सांगोला, सौ. मंगल लंबाते व सौ. स्वाती लंबाते, फलटण यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले.

मी स्वतः रत्नागिरी भागातली आहे त्यामुळे मी हे पदार्थ पूर्वी कधी पाहिले नव्हते. यावेळी पहिल्यांदाच पाहिले. हे तिन्ही पदार्थ आमच्याकडे करत नाहीत. मला ते खूप आवडले. कोथळे येथून आलेल्या महिलांनी स्पर्धेत क्रमांक मिळालेले पदार्थ पूर्वी खूप वेळा केले जात असत असे सांगितले.



सर्वात शेवटी माता बालक संस्थेच्या शोभाताईंनी खूप छान खेळ सांगितला. सर्व महिलांना त्यांनी हात धरुन गोल करुन उभे राहयला सांगितले. एकीच्या हातात एक टायर दिला व तो तिला पुढचीच्या गळ्यात घालायला सांगितला व त्यानंतर पुढचीने तो गळ्यातून खाली सरकवून, पायातून बाहेर काढायचा व दुसरीच्या हातात द्यायचा. नंतर तिने तो पायाकडून वर सरकवत गळ्यातून बाहेर काढायचा व पुढचीच्या हातात द्यायचा. अशा त-हेने एकीने गळ्यातून खाली व पुढचीने पायातून वर टायर सरकवायचा. हे सर्व करत असताना हात धरलेलेच ठेवायचे. सुरूवातीला सगळ्या जणींची खूप धांदल उडत होती. हा खेळ खेळताना खूप मजा आली.

**संगीता खापरे**

### वाचकांना आवाहन

आम्ही गेली १२ वर्षे नियमितपणे तोरणचा अंक काढतो आहोत. आम्हाला अंक वाचल्या नंतर अनेकदा वाचकांकडून अंकातल्या माहितीवर आधारित फोनवरून विचारणा होत असते. आपले प्रश्न आपण पत्ररुपाने विचारल्यास त्याची उत्तरे आम्ही आमच्या पुढील अंकात प्रकाशीत करत जाऊ. वाचकांनी आमच्या अंकात रस घेतल्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद.

## अंतरातील घडामोडी

१. १-४ ऑक्टोबर २००९: ३० मेंढपाल, अंतरा-हैद्राबाद, राजस्थानमधील कम्प्राविस व लोकहित पशुपालक संस्था मिरिओर यांच्या सहभागाने 'पिपल लेड ॲप्रोच' या विषयावर - अंतरा, पुणेतर्फे एका कार्यशाळेचे आयोजन.
२. ९-१० ऑक्टोबर २००९: निवडक मेंढ-पालकांसाठी अंतरातर्फे पशुदूत प्रशिक्षण
३. २२-२४ ऑक्टोबर २००९: इंडियन पोल्ट्री असोसिएशनच्या २६व्या वार्षिक संम्मेलनात डॉ. गायत्री राजूरकरांचा सहभाग
४. २१-२३ ऑक्टोबर २००९: सातारा व सोलापूर जिल्ह्यामध्ये अंतरातर्फे उत्तम दख्खनी मेंढी व बालिंगा स्पर्धा
५. २७ नोव्हेम्बर २००९ला अंतरा, हैद्राबाद येथे Breeding Invasions या अंतराच्या मेंढांवरील डीव्हीडीचे प्रकाान
६. १४ ते १८ डिसेम्बर २००९ दरम्यान झालेल्या किसान मेळाव्यात अंतराच्या कार्यकर्त्यांचा सहभाग - अंतराच्या औषधांना व प्रकाशनांना लोकांचा प्रचंड प्रतिसाद
७. १९ डिसेम्बर २००९ला अंतराच्या कार्यक्षेत्रातील मेंढपाळांची पुणे येथे झालेल्या महाऑर्गेनिक मेळाव्यास अभ्यास भेट
८. २०-२१ जानेवारी २०१०: व्यावसायिक कोंबडीपालनामध्ये चांगल्या निर्यातक्षम अंडी उत्पादनासाठी उत्तम व्यवस्थापन यावरील कार्यशाळेचे अंतरातर्फे आयोजन
९. १५ जानेवारी २०१० : ए.जे.डब्ल्यु.एस. अमेरिका येथून स्वयंसेवकाचे आगमन
१०. २२-२३ जानेवारी २०१०: महाराष्ट्राच्या पशुधोरण २००६च्या पुनर्पाहणीविषयक कार्यशाळेत डॉ. नित्या घोटगे यांची उपस्थिती
११. २-४ फेब्रुवारी २०१०:वन्य प्राणी - आरोगय व चिकीत्सा याविषयक परिषदेत डॉ. नित्या घोटगे यांची उपस्थिती
१२. २ फेब्रुवारी २०१० : स्विस कॉलेज ऑफ ॲग्रिकल्चरची विद्यार्थिनी कु. ॲनी क्रिस्टीनॅट हिचे शोध निबंधाच्या अभ्यासासाठी अंतरात आगमन
१३. ७-८ मार्च २०१०: कोथळे, सोलापूर व ८-९ मार्च २०१०: नरबे, रत्नागिरी येथे महिला दिनानिमित्त पाककला स्पर्धेचे आयोजन

बुक-पोस्ट

प्रति,

**अंतरा**
एफ, लँटाना गार्डन्स, एन.डी.ए. रस्ता,
बावधन, पुणे ४११ ०२१, महाराष्ट्र
दूरध्वनी : (२०) २२९५३५४६, २२९५३५४७
ईमेल : anthra.pune@gmail.com
वेबसाईट : www.anthra.org